| CNR NO.MHDH040002302026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६१/२०२६**<br>**चित्राबाई प्रकाश बोरसे आणि २**<br>**वि.**<br>**कोणीही नाही** |
|---|---|

## निशाणी १ वरील आदेश

## (पारित दिनांक ०८.०७.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व अर्जदारांनी अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

**अर्जदार यांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :-**

३. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र २ व ३ यांचे वडील प्रकाश गरबड बोरसे हे मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायम रहिवासी होते. त्यांचे दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. प्रकाश गरबड बोरसे यांची आई भटाबाई गरबड बोरसे या देखील दोंडाईचा येथेच दि. २९/०९/१९९४ रोजी दोंडाईचा येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. २ व ३ हे मुल व अर्ज दार क्र १ ही पत्नी असल्याने ते कायदेशीर वारस असून त्यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना मयत कै. प्रकाश गरबड बोरसे यांच्या मृत्यूपश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता

आहे. सबब, अर्जदारांतर्फे विनंती करण्यात आली आहे की, अर्जदार यांना ते कै. प्रकाश गरबड बोरसे यांचे वारस असलेबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे.

४. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात इतर कोणाच्या काही हरकती असतील, तर त्या मागवण्याकरीता 'वार्ता' या वृत्तपत्रात दिनांक २०/०४/२०२६ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर वृत्तपत्राची प्रत निशाणी क्र.१५ वर दाखल आहे. परंतु प्रस्तुत कामी अर्जदारांच्या अर्जास कोणीही हजर होऊन हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ निशाणी क्र.०९ वर अर्जदार क्र. १ चित्राबाई प्रकाश बोरसे यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. अर्जदारांनी निशाणी क्र.१३ वर दाखल केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत प्रकाश गरबड बोरसे यांचे दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. प्रकाश गरबड बोरसे यांची आई भटाबाई गरबड बोरसे यांचा देखील मुत्यु दिनांक २९/०९/१९९४ रोजी मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच मयत प्रकाश गरबड बोरसे यांचा मृत्यूसमयीचा व कायमचा पत्ता या न्यायालयाच्या न्यायक्षेत्रामध्ये असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालविण्याचे व निकाली काढण्याचे अधिकार या न्यायालयास आहेत. त्याचप्रमाणे अर्जदारांनी निशाणी क्र. १० ते १२ वर त्यांच्या आधारकार्डाच्या पडताळीत प्रती सादर केलेले आहे.

६. अर्जदारांच्या अर्जातील कथनांना व त्यातील त्यांच्या मागणीला कोणीही हरकत घेतलेली नाही. तसेच, त्यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा विना आव्हानित राहीलेला आहे. त्यामुळे त्यावर विश्वास ठेवणे रास्त होईल, असे माझे मत

आहे. वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की, कै. प्रकाश गरबड बोरसे हे मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायम रहिवासी होते. त्यांचे दिनांक ०९/०२/२०२६ रोजी दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच प्रकाश गरबड बोरसे याची आई भटाबाई गरबड बोरसे यांचा देखील मुत्यु दिनांक २९/०९/१९९४ रोजी मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. वरील पुराव्यावरुन हे ही स्पष्ट होते की, मयत प्रकाश गरबड बोरसे यांना अर्जात नमूद पत्नी व मुले असे नातलग आहेत. अशा परिस्थितीत, कै. प्रकाश गरबड बोरसे यांचे पश्चात अर्जदार हे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे त्यांना सरळ व कायदेशीर वारस आहेत, असा निष्कर्ष निघतो. सबब, बॉम्बे रेगुलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे, अर्जदार हे मयत प्रकाश गरबड बोरसे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतात. म्हणून, मी वरील चर्चीत कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**<u>– आदेश –</u>**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र. १ चित्राबाई प्रकाश बोरसे, अर्जदार क्र. २ पंकज चौधरी, अर्जदार क्र. ३ रोशन प्रकाश बोरसे हे मयत प्रकाश गरबड बोरसे यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करण्यात येते. सदर अर्ज हा फक्त कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्याबाबत मंजूर करण्यात आला आहे. सदर वारस दाखला इतर कोणत्याही कारणास्तव वापरला जाऊ नये.

३) योग्य तो मुद्रांक शुल्क भरून घेऊन, अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

४) बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ तसेच दिवाणी नियमावली परिच्छेद नं. ३१२ अन्वये वारस दाखल्यामध्ये तशी टिप ठेवण्यात यावी.

सही/–
(**आर. डी. पवार**)
सह दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा.

ठिकाण: दोंडाईचा
दिनांक: ०८.०७.२०२६